# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२४/अपील/१/२०२४/0922 | दिनांक: २१.०२.२०२४

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०३.०१.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | १५.०१.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | ०५.०२.२०२४ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : | २१.०२.२०२४ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०१/२०२४**

श्री. राजेश हिरालाल चौधरी ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक ०२.०१.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०३.०१.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक ०३.०१.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.०१.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक ०२.०२.२०२४ रोजी माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक ०५.०२.२०२४ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक ०६.०२.२०२४ रोजी नोटिस पाठवून दिनांक १५.०२.२०२४ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. त्या आनुषंगाने अपीलकर्ता हे स्वतः व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले.

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

१. दिनांक १३.१२.२०२३ को राजेश हिरालाल चौधरी द्वारा प्रस्तुत विनंती पत्र पर मा. आयोग तथा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित भुसावळ द्वारा की गई कार्यवाही की विस्तृत जानकरी प्रदान करे.
२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित भुसावळ जिल्हा जळगाव, की विभिन्न शिकायतों के संदर्भ मे मा. आयोग मे प्रस्तुत समस्त शिकायतों की विस्तृत जानकरी तथा मा. आयोग द्वारा की गई कार्यवाही की विस्तृत जानकरी प्रदान करे, दिनांक ०१.०१.१९९५ से जानकरी दिए जाने की तिथी तक.
३. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तथा मा. शासन द्वारा अधिकृत समस्त विद्युत संबंधित नि:विदा धारक/ ठेकेदारो की सूचि तथा अधिकृत किये जाने संदर्भ प्रमाणपत्र की साक्ष्यांकित प्रति प्रदान करे, दिनांक ०१.०१.१९९५ से जानकरी दिए जाने की तिथी तक.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

मुद्दा क्र. १ साठी - आपका दिनांक १३.१२.२०२३ विनंती पत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., प्रकाशगड, मुंबई ईस कार्यालय को दिनांक १० जानेवारी, २०२४ को ईमेलद्वारा भेजा गया है. (साथ मे ईमेल की प्रत संलग्न की है)

मुद्दा क्र. २ व ३ साठी – यह जानकारी आयोग के कार्यालय मे उपलब्ध नही है.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

अपेक्षित जानकारी प्राप्त न होने की स्थित में।

**अपीलामध्ये सुनावणी दरम्यान निदर्शनास आलेले मुद्दे:**

मुद्दा क्र. १ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२०२३ च्या त्यांच्या पत्रावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित भुसावळ यांनी केलेल्या कार्यवाही बाबत माहिती विचारली आहे. सदर माहिती ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संबंधित असल्या कारणाने सदर अर्ज दिनांक १३.१२.२०२३ हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, मुंबई या कार्यालयास १०.०१.२०२४ रोजी ईमेल द्वारे पुढील कार्यवाही साठी जन माहिती अधिकारी मविनिआ यांच्याकडून पाठवण्यात आलेला आहे.

तसेच, मुद्दा क्र. २ व ३ मध्ये विचारलेली माहिती ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संबंधित आहे आणि सदर माहितीची उपलब्धता आयोगाच्या कार्यालयात नाही ही वस्तुस्थिती आहे.

सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांनी त्यांनी केलेल्या तक्रारीचे निराकरण होण्यासाठी विनंती केली. त्याअनुषंगाने अपीलकर्ता यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी ग्राहकांसाठी त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २०२० बद्दल अवगत करून दिले व अपीलकर्ता आपली तक्रार योग्य मंचा समोर मांडण्यासाठी मार्गदर्शन केले.

त्याअनुषंगाने अपीलकर्ता यांना ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २०२० प्रमाणे अपील/तक्रार योग्य मंचा पुढे मांडण्यासाठी कळविण्यात येत आहे. सदर ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २०२० आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

त्यानुसार, सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.

**निर्णय**

**अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.**

(आभिजीत चाटुफळे)

**उप संचालक** (**प्रशासन व** वित्त) तथा प्रथम आपीलीय **अधिकारी**

प्रती,

श्री. राजेश हिरालाल चौधरी
शिवाजी नगर, पोस्ट के पास, भुसावळ,
भुसावळ, जिल्हा – जळगाव – ४२५२०१

(आभिजीत चाटुफळे)
**उप संचालक** (**प्रशासन व** वित्त) तथा प्रथम आपीलीय **अधिकारी**

प्रत,

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई